सन १९६१

# एकीनें रहा
## आणि
# नेकीनें वागा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२०१

★

विनोबा

REFBK-0011503

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# एकीनें रहा आणि नेकीनें वागा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28130 वि: निबंध
क्रमांक 1289 नों: दि: 15/5/61

विनोबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99403

REFBK-0011503

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :

**भाऊ पानसे**

ग्राम-सेवा-मंडळ

परंधाम विद्यापीठ, पो. पवनार (वर्धा)

आवृत्ति-दुसरी–५०००

मूल्य १९ नये पैसे

मुद्रक :

**मोहनलाल भट्ट**

राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 99403

# एकीनें रहा आणि नेकीनें वागा

तुम्ही एका च गांवांत शेजारी शेजारी राहतां, तुम्ही दोन गोष्टी करा. एकीनें रहा आणि नेकीनें वागा, मग तुमच्यावर कसलें हि संकट येणार नाहीं, असें मी गांवकऱ्यांना समजावून सांगतों. रेल्वेस्टेशनवर तिकिट ऑफिसजवळ शेंकडो लोक गोळा होतात, पण कुणी कुणाची पर्वा करीत नाहीं. प्रत्येकाला आपापली च काळजी असते. कारण तें कांहीं कुटुंब नसतें. तो समूह असतो. गांवांत हि जर असें च प्रत्येकजण आपला च स्वार्थ पाहूं लागला व शेजाऱ्याची कोणी कांहीं च चिंता करीनासे झालें तर तें कसें चालेल ? एका गांवांत एकत्र राहतां तर तुम्हांला एक झालें च पाहिजे. त्यासाठीं गांवाची जमीन एकत्र करावी च लागेल.

कांहीं लोक म्हणतात आम्ही जमिनीचे मालक आहोंत. आमच्याजवळ पट्टयाचीं कागदपत्रें आहेत. पण कागदपत्रांनीं का कुणी मालक होत असतो ? आम्ही जर जमिनीचे मालक असतों तर कां मरतों ? आम्ही येथून चालते होतों आणि ही जमीन येथें च राहते. "हें घर माझें, हें घर माझें" असें आम्ही म्हणतों पण घरांत राहणारे उंदीर हि 'हें घर माझें, हें घर माझें', असें म्हणत असतात. ते उंदीर त्या घरावर एका कवडीचा हि खर्च करीत नाहींत; तरी हि ते तें घर सोडीत नाहींत. ते मूर्ख उंदीर जसें, हें घर माझें आहे, असें म्हणतात तसें च आम्ही हि मूर्खासारखे ही जमीन माझी, हें घर माझें, असें म्हणतों. तो उंदीर हि मरतो आणि आम्ही हि मरतों. घर उंदराचें हि नाहीं अन् माझें हि नाहीं. त्या च प्रमाणें ही जमीन हि माझी नाहीं. जमिनीपासून आम्हांला अन्न मिळतें, हें म्हणणें बरोबर आहे. पण खाण्याचा हक्क सर्वांना

आहे. हें शेत 'माझें' आहे; मीं हें पेरलें आहे; त्यावर माझा हक्क आहे; असें आम्ही म्हणतों. पण इकडे शेतकरी, पीक माझें माझें म्हणत च असतो आणि तिकडे पक्षी येऊन त्याचें पीक खात च असतात. तर त्या पक्ष्यांचा हक्क पिकावर नाहीं काय ?

एक शेतकरी स्त्री होती. तिला वडील नव्हते, नवरा नव्हता, मुलगा हि नव्हता. एकटी च होती. तिचें एक लहानसें शेत होतें. त्यांत ती काम करी. पीक निसवल्यावंर त्याची राखण ती करूं शकत नसे, ती आपलें हें दुःख मला सांगूं लागली. सांगतां सांगतां ती स्वःत च म्हणाली, 'पण खरें च, पक्ष्यांचा हि हक्क आहे. परमेश्वरानें त्यांना निर्माण केलें आहे. तर त्यांना हि खाण्याचा हक्क आहे च.'

हिंदुस्थानांतील अशिक्षित शेतकरी बायासुद्धां, आम्ही जमिनीचे मालक नाहीं, मालक परमेश्वर आहे, हें जाणतात. जमिनीवर जर आमचा हक्क असेल, तर तो उंदीर आणि पक्षी यांचा हि आहे. आणि आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचा तर आहे च आहे.

## संतांची शिकवण

जमिनीचा मालक परमेश्वर आहे. आम्ही जर तिचे मालक बनलों असूं तर ही गोष्ट परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध आहे. आणि त्याच्या इच्छेविरुद्ध जर चालूं लागलों तर आम्ही कधीं हि सुखी होऊं शकणार नाहीं. नाना दुःखें भोगूं. आज हि तें च होत आहे. गांवांतील सर्व जमीन सर्वांची झाली तर सर्व गांवकरी मिळून मिसळून एकत्र शेती करतील. मग कुणी उच्च असणार नाहीं, कुणी नीच असणार नाहीं. जें काय पिकेल, तो परमेश्वराचा प्रसाद आहे, असें मानून सर्व लोक तो ग्रहण करतील.

श्रीमंताचें मूल असो कीं गरिबाचें असो, देवानें सर्वांना नागवें च उत्पन्न केलें आहे. आणि तो जेव्हां आम्हांला परत बोलावील तेव्हां हि आम्हांला हें सर्व येथें च सोडून जावें लागणार आहे. श्रीमंताला आपला महाल सोडावा लागेल आणि गरिबाला आपली झोपडी सोडावी लागेल. आमचें हें शरीर सुद्धां थोडे दिवस च टिकणार आहे. अशा स्थितींत आपल्या या शरिराचा उपयोग आपण परमेश्वराच्या सेवेंत केला पाहिजे. केवळ भोगपरायण असूं नये.

देहाला भूक लागते म्हणून आम्ही खातों, तहान लागते म्हणून पाणी पितों, पण हें सर्व तर जनावरें हि करतात. जर खाणें, पिणें, निजणें, सुखदु:खाचे भोग भोगणें आणि शेंवटीं मरणें; हा च क्रम चालला तर मनुष्य आणि पशु यांत फरक तो काय राहिला ? दुसऱ्याच्या दु:खानें दु:खी आणि दुसऱ्याच्या सुखानें सुखी होऊं शकणारें मन परमेश्वरानें माणसाला दिलें आहे. ही माणसाची विशेषता आहे. वाघाला भूक लागली आणि त्याच्या हातीं हरण लागलें नाहीं, कीं वाघ दु:खी होतो. पण त्या हरणाच्या दु:खानें वाघ कधीं दु:खी होत नाहीं !

संतांनीं आम्हांला हें सर्व शिकविलें होतें आणि आम्ही सर्वजण मिळून मिसळून गुण्यागोविंदानें राहत होतों. पण मधल्या काळांत आम्ही सर्व आळशी झालों. या आळसाच्या परिणामामुळें पैशाचें महत्त्व वाढलें आणि प्रेमाचें महत्त्व घटलें. हा पैसा आला आणि प्रेम पळालें. पैशामुळें आज समाजांत तीन वर्ग--पायऱ्या--निर्माण झाल्या आहेत.

## समाजाच्या तीन पायऱ्या

आज जे वरचे लोक आहेत त्यांच्या मनांत खालच्या लोकांबाबत तिरस्कार आहे. त्यांच्यांत हि कांहीं अपवाद असतात हें मी

मानतों. परंतु वरच्या लोकांचा खालच्या लोकांशीं प्रत्यही संबंध येत असतां हि, त्यांच्याबाबत वरच्या लोकांच्या मनांत प्रेम-भाव असत नाहीं, ही गोष्ट पुष्कळ वेळां दिसून येते. 'खालचे लोक मूर्ख आहेत, यांना काम करण्याची अक्कल नाहीं, हे आळशी आहेत, अंगचोर आहेत, यांच्यावर नजर ठेवली नाहीं तर हे काम च करीत नाहींत' असें वरचे लोक मानतात. 'हे बैल आहेत, यांना जास्त पैसे दिले तर त्याचा उपयोग करण्याची अक्कल हि यांना नाहीं. अगदीं धोकेबाज आहेत, लांडीलबाडी करतात,' असे हे लोक म्हणत असतात.

आणि वरचे लोक सर्व बदमाश आहेत, बेइमान आहेत, असें खालच्या लोकांचें वरच्या लोकांबाबत मत आहे. हे लोक त्यांच्या शेतांतून कामें करतात, दुकानांतून कामें करतात पण त्यांच्या मनांत वरच्या लोकांबद्दल द्वेष असतो. ते त्यांची निंदा करीत असतात. ते वरच्या लोकांकडून साह्य मागतात. साह्य मिळालें नाहीं तर शिव्या देतात. मिळालें तर म्हणतात आज दिलें आहे खरें पण उद्यां हें सगळें हा सवाईनें वसूल करून घेईल आणि आणखी काय काय ताप देईल कोण जाणे ! दोघांचें हि एकमेकांशिवाय चालत नाहीं. आणि दोघांचें हि मनांत एकमेकांविषयीं द्वेष आणि तिरस्कार असतो. अशी ही स्थिति आहे.

जे मधले असतात, त्यांच्यांत चढाओढ चालते. त्यांच्याजवळ पैसा हि जास्त नसतो आणि श्रम-शक्ति हि नसते. वरच्या लोकांजवळ पैसा असतो आणि खालच्या लोकांजवळ श्रम-शक्ति असते. म्हणून हे मधले लोक वरच्यांचा सामना करण्यासाठीं खालच्या लोकांशीं गट्टी करतात आणि खालच्यांना लुटण्यासाठीं वरच्यांशीं

संगनमत करतात. मोठ्या जमीनदाराकडून जमीन घेण्याच्या गोष्टीला ते होकार देतील पण लहान लहान गरीब भूमिहीनांना जमीन देण्याची गोष्ट निघाली कीं, यामुळें जमिनीचे अगदीं लहान तुकडे होतात, असें बोलायला लागतील. अशा प्रकारें या मधल्या लोकामधें चढाओढ--स्पर्धा--चालते. ते कधीं या पक्षांत तर कधीं त्या पक्षांत राहून आपलें स्थान अढळ राखण्याची खटपट करीत असतात.

वरच्या लोकांत मुख्य भावना तिरस्कार असते, मधल्यांत स्पर्धा आणि खालच्यांत द्वेष ! अशा रीतीनें समाजाचे आज तीन तुकडे झाले आहेत. या तिहींनीं एक व्हावें, आणि जसे घडवंचीचे तीन पाय असतात, तसा च आमचा समाज त्या तीन पायावर उभा रहावा. तिघे हि एकमेकांना साह्य करतील तर समाज मजबूत होईल.

## सर्वोदय-समाज

जरी समाजाचे तीन तुकडे झाले असले तरी तिहींत एक श्रद्धा आहे. त्या श्रद्धेमुळें च लोकांना आमचें म्हणणें समजतें आणि पटतें. आमच्या विचारांत जें सत्य आणि प्रेम आहे, त्यांचा लोकांना स्पर्श होतो. ते तो टाळूं शकत नाहींत. आणि त्यामुळें आमचा समाज आतां सुधारण्याच्या मार्गाला लागला आहे.

पूर्वीं असा एक काळ होता, जेव्हां जमिनीच्या लहान लहान तुकड्यांसाठीं खून, कत्तली होत. हल्लीं एखाद दुसरी घटना तशी होत असेल पण सर्रास तो प्रकार नाहीं. भावना बदलत आहे, असें आपण पाहत आहों, म्हणून च लोक जमीन देत आहेत. नाहींतर,

तसें पाहिल्यास बाबाजवळ काय शक्ति आहे ? बाबाजवळ केवळ सत्याची आणि प्रेमाची शक्ति आहे.

लोकांनीं आम्हांला शेंकडों संपूर्ण गांवें दिलीं आणि कित्येक गांवांनीं आपल्या जमिनीचा सहावा हिस्सा दिला. तसें पाहिल्यास सहावा हिस्सा आणि समग्र-ग्राम-दान यांत कांहीं विशेष फरक नाहीं. समग्र-ग्राम-दानांत मोठ्या लोकांना अधिक त्याग करावा लागतो. पण त्यांत फायदा हि अधिक असतो. सर्व गांव एक कुटुंब होतें आणि त्यामुळें गांवांची शक्ति वाढते. सहावा हिस्सा मिळाला तर गांवांतील सर्व भूमिहीनांना जमीन मिळते. पण कुणाजवळ कमी कुणाजवळ जास्त असा प्रकार राहतो च. सर्व गांव च दान दिलें तर जमिनीची मालकी च नाहींशी होते.

जेथें समग्र-ग्राम-दान मिळेल तेथें मोठ्यांच्या मनांत तिरस्काराची भावना रहायची नाहीं, लहानांच्या-गरीबांच्या-मनांत द्वेषाची भावना असणार नाहीं, आणि मधल्या लोकांच्या मनांत स्पर्धेची भावना राहणार नाहीं. कारण मग तेथें कोणी मोठा नसणार, कोणी लहान नसणार आणि कोणी मधला हि नसणार. सर्व सारखे होतील. कांहीं थोडासा फरक राहिला च तर तो हाताच्या पांच बोटांसारखा. पांचीं बोटें एकमेकांचें साह्य करतात, एकमेकांना सहकार्य देतात म्हणून पांच असून हि तीं लाखों कामें करतात.

समाजांत पांच बोटांसारखी समानता आणि सहकार्य असावें, अशी आमची इच्छा आहे. समाजांत सर्व लोकांनीं पांच पांडवांसारखे मिळून मिसळून राहायला पाहिजे. असें झाल्यास तिरस्कार, द्वेष आणि

स्पर्धा-रहित समाज बनेल. ज्या समाजांत प्रेम, आदर आणि सहकार्य आहे, असा समाज अस्तित्वांत यावा, अशी आमची इच्छा आहे. याला च आम्ही 'सर्वोदय समाज' म्हणतों.

सर्वोदय-समाजांत सर्वांचा उदय होईल. सर्व समान असतील. जेव्हां गांवोगांव लोक आमचा हा विचार समजतील, तेव्हां ते गांवोगांव 'सर्वोदय-समाज' स्थापन करतील. आमच्या गांवांतील सारी जमीन, सारी संपत्ति, सर्व शक्ति आणि बुद्धि सर्व गांवाची आहे, असें ते मग म्हणायला लागतील. आमच्या गांवांत प्रत्येक माणसाजवळ जी जी वस्तु आहे, ती सर्व गांवाची आहे, आमच्या गांवांत प्रत्येक मनुष्य स्वतःची चिंता करीत नाहीं, दुसऱ्याची चिंता करतो आणि गांवाचे लोक त्याची चिंता करतात, असे नंतर ते बोलूं लागतील.

## मालकांची दाटी

गांवांतील लोक जेव्हां एकमेकांच्या सुखदुःखांत भाग घेतील तेव्हां सर्व सुखी होतील. मनुष्याला हें करणें कठिण नाहीं. उलट हें च स्वाभाविक आहे. परंतु लोक भलेपणा, मानवता आणि संतांची शिकवण विसरले, मनस्वी चढले आणि जमिनीचे मालक बनले. जिकडे पहावें तिकडे मालक च मालक.

जगांत मालक एक च आहे, असे च आम्ही आजवर म्हणत आलों. पण आजकाल पहावें तर कोणी लहान मालक तर कोणी मोठा मालक. या मालकांनीं नुसता कहर केला आहे. हे दुनियेला सतावीत आहेत आणि स्वतः हि संत्रस्त आहेत, ते सुखी हि नाहींत. सर्व जग त्यांचा द्वेष करतें. जे त्यांच्या शेतावर काम करयला

जातात, ते त्यांना फसविण्याचा यत्न करतात. ते आजारी पडतात तेव्हां पैसे घेतल्याशिवाय डॉक्टर त्यांना पहायला येत नाहीं आणि आजकाल तर ते मेल्यावर हि सरकार त्यांना 'मृत्यु' कराच्या रूपानें लुटतें. घरांत बाप-लेकांचें पटत नाहीं आणि भावाभावांत हि बेबनाव असतो.

पुराणांत दोन राक्षसांची कथा आहे. दोन भाऊ होते. त्यांचें एकमेकांवर फार प्रेम होतें. ते देवांना फार भारी झाले. देवांनीं त्यांना मोहित करण्यासाठीं एक स्त्री पाठवली. ती गेली आणि त्यांच्यासमोर जाऊन उभी राहिली. प्रत्येक भाऊ म्हणायला लागला "ही माझी आहे, मी हिचा स्वामी आहें." दोघे आपसांत लढूं लागले. याची गदा त्याच्या डोक्यावर आणि त्याची गदा याच्या डोक्यावर पडूं लागली. दोघे हि मेले. दोघे संपले आणि इंद्र सुखी झाला.

अशा रीतीनें जेथें माझें माझें च चालतें तेथें झगड्याशिवाय दुसरें काय निष्पन्न होणार? जे लोक स्वतःला मालक म्हणवितात, त्यांच्या घरांतून रोज भांडणें चालतात, त्यामुळें ते सुखी नाहींत. आजच्या समाजरचनेंत मालक हि सुखी नाहीं आणि मजूर हि सुखी नाहीं. असला च तर मालकापेक्षां मजूर सुखी असेल, कारण त्याला रात्रीं निदान झोंप तरी चांगली येतें.

## परमेश्वराची दया

परमेश्वर फार दयाळु आहे. आमचे आई-बाप आणि गुरु जितके दयाळु असतात त्याहून किती तरी अधिक दयाळु परमेश्वर असतो. त्याच्या दयेची बरोबरी कोणी हि करूं शकत नाहीं. आम्ही त्याच्या दयेचा उपयोग करूं तर भाग्यवान् होऊं. वरून पाऊस

पडत आहे अशा वेळीं शेतकरी शेतांत धान्य पेरणार नाहीं तर त्या शेतांत गवत च उगवणार. त्या च प्रमाणें परमेश्वराच्या दयेचा जो वर्षाव होतो, त्याचा उपयोग करायला शिकलें पाहिजे, नाहींतर दुःखें मागें लागतात. म्हणून प्रत्येक प्रसंगीं आपण परमेश्वराचें स्मरण करावें. त्याची प्रार्थना करावी.

## चुका सुधारूं या

आई ज्याप्रमाणें सर्वांवर सारखें प्रेम करते तसा देव हि सर्व प्राणिमात्रांवर सारखें प्रेम करतो. पोरें जर आपसांत भांडूं लागलीं तर त्यांच्या आईला केवढें दुःख होईल ! ती म्हणेल "अरे तुम्ही माझीं मुलं आहांत, मीं तुम्हांला जन्म दिला आहे. मिळून मिसळून तुम्ही राहिलात, तर मला आनंद होईल." तसें च परमेश्वर हि आपल्याला म्हणत आहे––मुलांनो, मी तुम्हा सर्वांवर सारखें प्रेम करतों तसें तुम्ही हि परस्परांवर सारखें प्रेम करा.

देवानें आम्हांला हवा, पाणी, सूर्यप्रकाश आणि आकाश दिलें आहे. हें जसें सर्वांसाठीं दिलें आहे तशी च जमीन हि सर्वांसाठीं दिली आहे. जर उद्यां कांहीं लोक पाण्याचे मालक झाले तर परमेश्वराला तें बरें वाटेल ? आणि परमेश्वराला जर तें बरें वाटलें नाहीं तर आम्ही आनंदांत राहूं शकूं ? पण आज कांहीं लोक जमिनीचे मालक बनले आहेत आणि पुष्कळांच्या जवळ जमीन मुळीं च नाहीं. देवाला ही गोष्ट आवडणार नाहीं. म्हणून आम्हीं जी चूक केली आहे ती सुधारली पाहिजे.

## इंग्रज गेले. राजे हि गेले

इंग्रजांचा या देशावर ताबा होता, ही गोष्ट तुम्हांला माहीत आहे. आम्ही हिंदुस्थानचे मालक आहों, असें ते म्हणत असत. येथें

येथले च शेतकरी जमिनीची वहिती करीत असत. तरी हि इंग्रज तिचे मालक झाले होते. इंग्रज या देशाचे मालक असूं शकत नाहींत. ही सर्व भूमि या देशांतील रहिवाशांची आहे, असें गांधीजींनीं आपल्याला शिकवलें. "कृपा करून या देशावरील ताबा सोडून चालते व्हा" असें शेंवटीं इंग्रजांना आपण सांगितलें. ते प्रेमानें राहते तर आमची हरकत नव्हती पण ते मालक होऊन राहूं शकत नव्हते. आम्ही जेव्हां असें बोलायला लागलों तेव्हां त्यांनीं आम्हांला तुरुंगांत टाकलें आणि खूप त्रास दिला. शेंवटीं आतां हे कांहीं ऐकत नाहींत असें जेव्हां त्यांच्या ध्यानांत आलें, तेव्हां त्यांनीं मालकी सोडली आणि ते चालते झाले.

त्यांच्यानंतर येथील राजे-महाराजे; ते हि मालक बनत होते. 'मालकी सोडा कारण जमीन सर्वांची आहे, मालकी सोडली तर तुम्ही हि येथें प्रेमानें राहूं शकाल' असें आम्हीं त्यांना हि सांगितलें, आज त्यांनीं मालकी सोडली आहे आणि आम्हीं हि त्यांच्या खाण्यापिण्याची पूर्वींसारखी च व्यवस्था केली आहे. अशा प्रकारें इंग्रज गेला, राजेमहाराजे गेले. देवाला आनंद झाला. हिंदुस्थानला कह्यांत ठेवणारे हे मालक चालते झाले.

हे मोठे मोठे मालक गेले तरी हि हे लहान लहान मालक अजून आहेत च. सापानें बेडूक पकडावा आणि बेडकानें माशी धरून ठेवावी, असें हें आहे. हा एक मोह च आहे. मूर्ख व अडाणी प्राण्यांना हें कळत नाहीं पण आपण बेडूक नाहीं माणसें आहों. परमेश्वराची इच्छा काय आहे, हें समजण्याची अक्कल आम्हांला आहे. परमेश्वर सर्वांना सारखा पाहतो. कांहीं भेदभाव करीत

नाहीं. तसें च आम्हीं माणसांनीं हि वागलें पाहिजे. आम्ही सर्व भावा-भावासारखे वागलों तर सुखी होऊं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
21736 वि:
क्रमांक 1201 नों: दि:

## पैशाची भुरळ

हिंदुस्थानच्या जमिनींत इतकी शक्ति आहे कीं ती आपणांस उपाशी ठेवणार नाहीं. येथें गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, गोदावरी-सारख्या चांगल्या नद्या आहेत, चांगले डोंगर आहेत, वनस्पति आहेत, औषधि आहेत, धान्य आहे, फळफळावळ आहे, भाज्या आहेत, सर्व आहे. काय नाहीं ? परमेश्वरानें किती उत्तमोत्तम देणग्या आम्हांला दिल्या आहेत. दोन हात दिले आहेत, बुद्धि दिली आहे, हृदय दिलें आहे. त्यानें आमच्यावर प्रेमाचा केवढा वर्षाव केला आहे. आमच्या-वर किती त्याचे उपकार ! आम्हांला कमतरता कशाची ? पण मधल्या काळांत आम्ही हें सारें विसरलों पैशाला भुरळलों, आणि देवाचें नांव घेण्याऐवजीं पैशाचें च नांव घ्यायला लागलों.

शेजाऱ्याची सेवा केली तर त्याचें हि पैशांत मोल, अशी आज स्थिति आहे. आजारी मनुष्य डॉक्टरला औषध मागतो तर डॉक्टर आजाऱ्याला पैसे मागतो. पूर्वीं असें नसे. गांवचा सुतार प्रत्येकाच्या घरचें जें काय काम निघेल तें करून देई, त्यासाठीं पैसे मागत नसे. वर्षाच्या शेंवटीं जेव्हां पीक येई, तेव्हां प्रत्येक शेतकरी आपापल्या पिकांतील एक भाग त्या सुताराच्या घरीं पोंचता करी. या च प्रकारें गांवांतील लोहार, चांभार, वैद्य, शिक्षक इत्यादि गांवाची सेवा करीत आणि त्यांना पिकाचा एक भाग मिळे. शेतकऱ्याच्या सुखदु:खांत सर्वांचें सुख-दुःख सामावलेलें असे. पण आज प्रत्येकजण

हिशेब करून पैसे मागतो. वैद्य तर मरणारालासुद्धां पैसे मागतो. पूर्वीं ज्या पद्धतीनें गांवाचा व्यवहार चाले, त्यानें गांव सुखी होता. गांवांत जमिनीचा कुणी मालक असणार नाहीं, जमीन सर्वांची होईल, सर्व एकत्र होऊन मिळून मिसळून कामें करतील, एकमेकांची सेवा करतील तर सर्व सुखी होतील. एखाद्या शेतांत कांहीं काम निघालें, कोठें विहीर खणायची असली कीं सर्वजण धावून जातील. कुणाच्या शेतांत पीक कमी आलें तर सर्वजण आपल्या पिकांतला थोडा थोडा भाग त्याला देतील अशा प्रकारें गांवाला कुटुंब मानून आम्ही राहूं तेव्हां परमेश्वर संतुष्ट होईल.

इंग्रजांची मालकी नाहींशी झाली हें पाहून परमेश्वर संतुष्ट झाला. राजामहाराजांची मालकी संपली हें पाहून परमेश्वर संतुष्ट झाला. आतां लहान लहान मालकांनीं हि आपली मालकी सोडावी आणि परमेश्वराच्या भक्तीला लागावें. जबरदस्तीनें करण्याची ही गोष्ट नाहीं. परस्परांच्या प्रेमानें एकमेकांना समजावून हें काम करावयाचें आहे.

आज कांहीं लोक जमीनीचे मालक होऊन बसले आहेत. बाकीचे सारे मोल-मजूर आहेत. पण हे जे मोल-मजूर आहेत त्यांचें च खरें मोल आहे. ते च मूळ पाया आहेत. ते मेहनत करतात. त्यांनीं काम केलें नाहीं तर पीक कसें येईल ? म्हणून ज्यांना आपण मोल-मजूर म्हणतों, त्यांचा हि जमिनीवर हक्क, मालक म्हणविणारा-इतका च आहे. तुम्ही सर्वजण एक व्हा आणि मिळून मिसळून रहा, सर्व वाटून खा, एकत्र काम करा आणि परस्परांची सेवा करा, हें च आम्ही गांवो-गांव जाऊन लोकांना समजावीत असतों.

परमेश्वरानें काम करण्यासाठीं आम्हांला दोन लांब लांब हात दिले आहेत. मग आम्हांला कोणतें हि संकट, संकट कां वाटावें ? देवानें आम्हांला एक लहानसें च तोंड दिलें आहे. रावणासारखीं जर दहा तोंडें त्यानें आम्हांला दिलीं असतीं तर आमची काय स्थिति झाली असती ? देवानें आम्हांला दहा तोंडांचा राक्षस केलें नाहीं. पण हे शहरचे लोक राक्षसासारखे च करतात. ते आपल्या-जवळ दहा माणसांचें धान्य ठेवतात. त्यांना धनाचा फार सोस (लोभ) असतो. ते त्याच्या राशीच्या राशी जमा करून ठेवतात. आणि एके दिवशीं सारें सोडून चालते होतात. आम्ही हि जर असें च वागलों तर आम्ही कधीं हि सुखी होणार नाहीं.

आम्ही जेव्हां हातांनीं काम करूं आणि दुसऱ्यांची सेवा करूं, तेव्हां च सुखी होऊं. परंतु आज आपण आपल्या हातांचा उपयोग दुसऱ्यांची संपत्ति हिसकाविण्यांत करीत असतों. माझ्या शेजाऱ्याला दोन हात आहेत, आणि मला हि दोन हात आहेत. जर त्याचे दोन हात आणि माझे दोन हात, मिळून एकत्र काम करतील तर सर्वांना खायला मिळेल. पण माझे दोन हात त्याच्या दोन हातांना आडवे येतात आणि त्याचे दोन हात माझ्या दोन हातांना आडवे येतात आणि सारे दुःखी होतात. म्हणून तुम्ही सर्वजण एकत्र व्हा, असें माझें तुम्हांला सांगणें आहे.

## भेदासुराचा नाश होवो

लहान गांवांचे तुकडे तुकडे झाले तर गांवांची शक्ति कशी वाढेल ? तीं एक झालीं तर गांवें लहान असलीं तरी त्यांची शक्ति वाढेल. तागाचा तंतु किती कमजोर असतो, पण त्याची दोरी वळली

कीं तो मजबूत होतो. प्रत्येक गांवाची अशी दोरी वळली जावी, असें आम्हांला वाटतें. पण प्रत्येकाची आज वेगवेगळी मालकी आहे. जो तो आपल्या च घराची चिंता करतो. एकाच्या चिंतेंत दुसरा भाग घेत नाहीं. प्रत्येकाला आपल्या शेताची, आपल्या बैलांची, आपल्या बीं-बीयाण्याची आणि आपल्या कर्जाची चिंता आहे. अशा स्थितींत गांव मजबूत—शक्तिमान--कसें होईल ?

म्हणून गांवाचें एक कुटुंब करा असें आम्ही म्हणतों. गांव एक झालें तर तें कसें चालेल असें कांहीं जणांना वाटतें. पण जेव्हां वेग-वेगळे होते तेव्हां जास्त अडचणी होत्या कीं एक झाल्यावर अधिक होतील; याचा त्यांनीं विचार करावा.

गांवोगांव या विचाराची आग पसरावी आणि जितकी अपवित्रता आहे ती सर्व भस्म व्हावी, अशी आमची इच्छा आहे. मालकी नाहींशी व्हावी, व भेदासुराचा नाश व्हावा. रावणाचीं जशीं दहा शिरें होतीं तसे आज गांवांतून दहा दहा मालक असतात. म्हणून गांव रावण होतें. प्रत्येक गांवानें दहा डोक्यांचा रावण न होतां, एका डोक्याचा मनुष्य व्हावें, असें आम्हांला वाटतें.

## शक्ति वाढविण्याची युक्ति

एक लहानशी च गोष्ट घ्या--हिंदुस्थानांत पांच लाख लहान लहान गांवें आहेत. या हिशोबानें प्रत्येक गांव सरासरी पांचशे लोकसंख्येचा असणार. अशा लहान लहान गांवांतील लोक जर वेगळे वेगळे राहिले आणि त्यांना बाहेरून कांहीं मदत मिळाली नाहीं तर त्या गांवांची शक्ति कशी वाढेल, हा विचार करण्या-सारखा प्रश्न आहे. तीं गांवें फार दुबळीं राहतील. म्हणून त्यांची

शक्ति वाढविण्यासाठीं आम्हीं एक युक्ति सांगितली. गांवाचें एक कुटुंब करा. त्याला गांव म्हणूं नका. कुटुंब म्हणा.

आमच्या कुटुंबांत अडीचशे किंवा तीनशे माणसें आहेत, असें तुम्ही म्हणूं शकला तर तुमची शक्ति वाढेल आणि तुम्ही बलवान् ठराल. मला तीन मुलें आहेत, चार मुलें आहेत, ही भाषा न वापरतां, गांवांतील सर्व मुलें माझीं आहेत असें आमच्या भगिनींनीं म्हणायला पाहिजे. एका लहानशा गांवांत हि तुम्ही वेगवेगळीं कुटुंबें करून राहूं लागला आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांची कांहीं चिंता तुम्हीं केली नाहीं, तर तुम्ही सुखी होणार नाहीं. पण जर हीं गांवें कुटुंबें होतील, तर त्यांच्यासारखें सुखी कुणी हि असणार नाहीं.

शहरांतील लोकांना एका कुटुंबासारखें होऊन राहणें जरा कठिण आहे. आज मोठमोठ्या शहरांची लोकसंख्या दहा लाख, वीस लाख, किंवा साठ लाख असते. त्यांच्यासमोर आपण अगदीं च असमर्थ आहों असें खेड्यांतील लोकांना वाटत असतें. यासाठीं गांवांतील लोकांनीं आपलें एक कुटुंब करावें म्हणजे ते बलवान् होतील.

## गांवाचें एक कुटुंब

गांवाचें एक कुटुंब करण्याचा अर्थ, सर्वांचा स्वयंपाक एका च जागीं व्हावा असा नाहीं. आज होत आहे तसा च वेगवेगळा स्वयंपाक करणें सोयीच्या दृष्टीनें योग्य ठरेल. पण गांवांतील सर्व जमीन गांवाची होईल. जमीन आमचा आधार आहे. जमिनीपासून आम्हांला अन्न मिळतें. आमच्या गायी जमिनीवर चरतात. आमचीं

घरें जमिनीवर होतात आणि तीं हि मातीची च असतात. आम्ही मेलों तरी मातींत च मिळतों. ही धरती आमची आई आहे आणि आम्ही तिचीं लेकरें आहोंत. धरतीमातेचा कुणी मालक असूं शकत नाहीं. पण आज कांहीं थोडे लोक मालक झाले आहेत आणि पुष्कळसे भूमिहीन बनले आहेत.

तुम्ही वारूळ पाहिलें असेल. लहान लहान मुंग्या हि एकत्र काम करून किती सुंदर घर तयार करतात! त्या घराला मीं तर 'भुवनेश्वर' नांव दिलें आहे. वाघ, सिंह असलेल्या अरण्यांत हि त्या मोठ्या निर्भयतेनें राहतात. त्यांच्यापासून आपण धडा घेतला पाहिजे. त्या जर वेगवेगळ्या राहतील तर या जगांत त्यांचा टिकाव तरी लागेल? पण त्या एकत्र राहतात आणि हें 'भुवनेश्वर' आम्हा सर्वांचें आहे, असें म्हणतात. "माझें माझें" असें त्या म्हणत नाहींत. त्या च प्रमाणें आपण हि माझें माझें सोडून देऊं तर सुखी होऊं.

गांवांतील सर्व जमीन आमची आहे, सर्व संपत्ति आमची आहे. आम्ही सर्वजण भाऊ भाऊ आहोंत. सोयीच्या दृष्टीनें घरो-घर थोडी थोडी जमीन वाटूं पण मालक गांव असेल. कुणाच्या शेतावर मदतीची गरज असेल तर तो हक्कानें सर्वांना बोलावील. कुणाच्या शेतांत पीक कमी आलें तर लोक त्याला आपल्या पिकाचा एक अंश देतील. जमीन सर्वांसाठीं च आहे. कारण ती देवानें निर्माण केली आहे. आपण अेक मूठभर मातीसुद्धां निर्माण करूं शकत नाहीं, पांडव पांच च होते. त्यांना अरण्यांत फिरावें लागे तरी पण ते निर्भय होते. कारण ते मिळून मिसळून राहत. देवानें हि आपली शक्ति त्यांच्या च बाजूला लावली. अशा प्रकारें

जे लोक एकोप्यानें राहतील, एकमेकांसाठीं त्याग करतील, ते लहान ठरणार नाहींत, देव त्यांना मदत करील.

## खरी जीवन-विद्या

गांवाचें एक कुटुंब कराल तर जनतेमधें खरें जीवन प्रकट होईल. मिळून मिसळून काम करणें, एकमेकांसाठीं त्याग करणें, आपल्या देहःची चिंता न करणें आणि सर्वांची सेवा करीत करीत रामाचें नांव घेणें, ही च खरी जीवन-विद्या आहे, तुम्हांला ही जीवन-विद्या प्राप्त व्हावी, अशी माझी इच्छा आहे.

आज जगांत अशांतता फार आहे. हिंदुस्थानांत अपार दुःख आहे. पण जितकें दुःख आहे त्या मानानें अशांतता नाहीं. कारण येथील जनतेच्या मनांत शांतता भरलेली आहे. अनेक वर्षें संतांनीं जी शिकवण येथील जनतेला दिली, तिच्यामुळें संकटाच्या काळांत सुद्धां येथील लोकांची बुद्धि शांत राहते. त्या हिशेबानें पाहिलें तर जगांत आज अशांतता पुष्कळ जास्त आहे. जगांतील लोक एक-मेकांना भितात आणि खूप शस्त्रास्त्रें वाढवितात. एक बाँब टाकला कीं लक्षावधि लोक मरावेत असे अजस्त्र बाँब ते तयार करूं लागले आहेत.

कांहीं दिवासांपूर्वीं आपल्या देशाचे पुढारी पंडित नेहरू युरोपच्या लोकांना समजाविण्यासाठीं तिकडे गेले होते. ते अनेक देशांत हिंडले आणि त्यांनीं तेथील लोकांना समजाविलें कीं, आप-आपसांत युद्ध करूं नका. त्या देशांनीं प्रेमपूर्वक त्यांचें म्हणणें ऐकलें. सर्व जगाला पंडित नेहरूंनीं जो उपदेश केला त्याप्रमाणें त्यांच्या देशानें चालावें, अशी च त्यांची इच्छा असणार.

हिंदुस्थानच्या हाडांत, रक्तांत शांतता आहे. म्हणून येथील लोक संकटांत सुद्धां शांत राहतात. पण आम्हीं या संकटांना, या दारिद्र्याला, नाहींसे केलें पाहिजे. म्हणजे येथें पूर्ण शांतता राहील आणि ऐक्य वाढेल. आमच्याहून जे अधिक दुःखी आणि दरिद्री आहेत, त्यांच्याकडे आम्हीं लक्ष पुरविलें पाहिजे. गांवोगांव लोक जर एक होऊन काम करतील तर गांवांत कुणी दुःखी राहणार नाहीं. सर्व जगांत शांतता असावी, असें आम्ही जर इच्छित असूं तर आम्हांला खेड्यापाड्यांतून जमिनीची मालकी नाहींशी केली पाहिजे. जमीन गांवाची आणि कारखाने देशाचे अशी स्थिति झाली पाहिजे. कुणी मालक असतां कामा नये, हें च सुखाच्या प्राप्तीचें साधन आहे. 'मी' 'माझें', 'तूं' 'तुझें' हें जें द्वैत आहे, त्या द्वैतामुळें च मनें तुटलीं आहेत. शेजाऱ्या-शेजाऱ्यांत, देशादेशांत जातीजातींत भेद पडले आहेत. आम्हांला हे सर्व भेद नाहींसे करावयाचे आहेत.

मनुष्याच्या हृदयांत आणि चिंतनांत शक्ति असते. जगांत एक शक्ति विचाराची आहे, दुसरी प्रेमाची आहे आणि तिसरें धर्माचें बळ आहे. याशिवाय चौथें बळ नाहीं. कायद्याची शक्ति यांच्या मागोमाग येते. म्हणून लोक प्रेम, धर्म, सत्य समजतील तर सारा समाज बदलेल. कोटचवधि लोक आपलें जीवन व्यतीत करतात. त्यांना कायद्याची माहिती सुद्धां नसते. हिंदुस्थानांत कोटचवधि लोक स्नान केल्याखेरीज जेवीत नाहींत, यासाठीं कोणी कांहीं कायदा केला आहे काय? स्नान केल्याखेरीज जेवूं नये, असा येथें अनेक वर्षें प्रचार झाला आहे. सत्पुरुषांनीं गांवोगांव जाऊन तो प्रचार केला. आपला देश सत्पुरुषांनीं घडविला आहे.

## सत्पुरुषांचा देश

हा महापुरुषांचा देश आहे. येथील लोक कधीं संपत्तीला उच्च स्थान देत नाहींत. कोणी चैन करीत असेल अथवा इंग्लंड अमेरिकेहून शिकून आला असेल तर त्याला येथील लोक मोठा माणूस समजत नाहींत. एखाद्याजवळ राक्षसासारखी शक्ति आहे, शस्त्रास्त्रें आहेत म्हणून त्याला ते मोठा मानीत नाहींत. तर ज्यांच्या मनांत प्रेम आहे, जीवनांत त्याग आहे, जे देवाचे भक्त आहेत, अशांना च येथील लोक मोठा माणूस समजतात.

सिकंदर बादशाहानें येथील राजाचा पराभव करून स्वत: मालक झाला. एके दिवशीं तो रस्त्यानें जात असतां, त्यानें एक साधु बसलेला पाहिला. सिकंदराला पाहून तो साधु जागचा हलला नाहीं आणि त्यानें त्याला नमस्कार हि केला नाहीं. 'तूं कोण आहेस' असें सिकंदरानें त्याला विचारलें. "मी दुनियेचा मालक आहें" असें त्या साधूनें उत्तर दिलें. सिकंदर घाबरला. त्याला वाटलें, जग जिंकण्यासाठीं मी किती प्रयत्न करीत आहें. माझ्याजवळ एवढें सैन्य आहे. याच्याजवळ तर कांहीं च नाहीं. मग हा दुनियेचा मालक असणार कसा? तो साधूला म्हणाला 'मी जगाचा मालक आहें हें तुला माहीत नाहीं, असें दिसतें.' साधु त्याला म्हणतो "मी तर तुला ओळखत हि नाहीं, मग तूं दुनियेचा मालक कसला ?" असे फकीर, आपल्या देशांत पूर्वीं हि होते आणि आज हि आहेत.

हिंदुस्थानचे लोक जगांत वावरतात, संसार करतात, परंतु त्यांचें सारें चित्त परमेश्वराच्या ठायीं लागलेलें असतें. जगाला ते

अधिक महत्त्व देत नाहींत. हें योग्य हि आहे. कारण या च मुळें हिंदुस्थानांतील लोक आज दहा हजार वर्षे टिकून आहेत.

एकोप्यानें रहायला शिकाल तर तुम्हांला बाहेरचें साह्य हि सहज मिळेल, तुमचें आंतरिक बळ वाढेल आणि परमेश्वराची कृपा हि होईल. तुमच्या गांवांत मधुर वाणी च ऐकायला आली पाहिजे, कटु शब्द कानीं पडतां कामा नयेत. नेहमीं सत्य च बोललें पाहिजे. तुम्ही दोन्ही हातांनीं काम कराल, एकमेकांवर प्रेम कराल आणि रामनामाचा जप कराल तर तुम्ही सुखी व्हाल.

## ग्राम-समाजाचें चिंतन

आज प्रत्येकजण वेगवेगळी चिंता करतो. परंतु आतां प्रत्येकाला अशी चिंता करावी लागणार नाहीं. ग्राम-समाजाचें भलें कसें होईल, असा विचार आतां प्रत्येकजण करील. लोक अशा प्रकारें विचार करायला लागतील तर त्यांच्या बुद्धीचा विकास होईल. सर्व गांवांसाठीं विचार करण्याची मनुष्याला जेव्हां संवय लागेल तेव्हां तो उन्नत होईल. आज प्रत्येकाला आपली, आपल्या घराची, आपल्या शेतीची, आपल्या मुलाबाळांची चिंता करावी लागते. त्याच्या चिंतेंत दुसरा कुणी सहभागी होत नाहीं. मग त्याच्या अकलेला सुचतें तसें तो करतो. कधीं कर्ज हि काढतो. त्याच्या हातून कांहीं चूक झाली तर लोक त्याला हंसतील मदत कोणी करणार नाहींत. उलट कसा मूर्ख आहे, आपल्या शक्तीच्या बाहेर कर्ज घ्यावें कशाला, घेतलें त्याचें फळ आतां भोगीत आहे, असें म्हणतील. तो मूर्ख हि आपल्या गांवचा च माणूस आहे, हें ते लोक लक्षांत घेत नाहींत. त्या माणसाचा जो प्रश्न तो आपल्या गांवचा

99403

च प्रश्न आहे. सर्वांनीं मिळून त्याला साह्य करायला हवें. म्हणून मालकी नाहींशी करून गांवाचें एक कुटुंब बनवा. त्यामुळें तुम्हाला पुष्कळ सुख लाभेल, देवाची कृपा होईल, प्रत्येकाच्या बुद्धीचा विकास होईल, हृदय शुद्ध होईल, पीक वाढेल, चिंता घटेल आणि दुःख व दारिद्रच कमी होईल. यांत नुकसान कांहीं हि व्हायचें नाहीं. सर्व प्रकारें फायदा च होईल, असें मी वारंवार सांगत असतों.

## गांवाचें दुकान

गांव एक करणें आणि गांवाचें उत्पादन वाढविणें या दोहीसाठीं आम्हीं एक च युक्ति दाखविली आहे. एका च किल्लीनें हीं दोन्हीं कुलुपें उघडतील. गांवाची सर्व जमीन गांवाच्या स्वाधीन करा आणि सर्व गांवाचें एक कुटुंब बनवा म्हणजे ऐक्य होईल, असें मीं सांगितलें. मग गांवचे लोक, आम्ही आमच्या गांवांत बाहेरचें कापड येऊं देणार नाहीं, आमचा कपडा गांवांत च बनवूं, असा निश्चय करतील. आज गांवांत प्रत्येकजण आपापल्या मर्जीप्रमाणें बाहेरचा माल विकत घेतो. अशा स्थितींत उत्पादन कसें वाढेल ? गांवांत घाणा चालू आहे पण लोक घाणीचें तेल न वापरतां मीलचें तेल वापरतील तर तो धंदा कसा टिकेल ? म्हणून सर्व गांवकऱ्यांनीं मिळून गांवाचें भलें करण्याचा निश्चय केला पाहिजे. आज बाहेरचे व्यापारी खेड्यांतील लोकांना लुटीत आहेत. एका खेड्यांत तर चार हजार रुपयांचा कपडा आणि दोन हजार रुपयांचें मीठ येत असल्याचें आमच्या पहाण्यांत आलें इतकें मोलवान मीठ जगांत कोठें च येत नसेल. याचा अर्थ गांवकऱ्यांना व्यापारी फसवितात, असा च होतो. म्हणून गांवकरी एकत्र येऊन आपलें एक दुकान उघडतील तर त्यांना कुणी फसवूं शकणार नाहीं.

हें सर्व करण्यासाठीं गांवांतील जमीन गांवाची करा. मालकी तर परमेश्वराची असणार. गांवांतील लोकांनीं रोज संध्याकाळीं एका जागीं जमून तेथें प्रार्थना करावी, कांहीं श्रवण करावें, वाचावें, आणि सर्वांनीं मिळून गांवाच्या बऱ्यासाठीं विचार करावा. काय पेरावें, किती पेरावें, गांवांत स्वच्छता कशी ठेवावी, दुकान कसें चालवावें या बाबतींत आज कोण विचार करतो ?

**गांव-पक्ष बनवा**

तुम्ही लोक गांवाचें एक कुटुंब करा आणि प्रेमानें रहा. ही च गोष्ट समजावण्यासाठीं मी गांवोगांव फिरत आहें. इकडे आम्ही अशा प्रकारें ऐक्य करण्याचा प्रयत्न करीत आहोंत तर तिकडे लोक वेगवेगळ्या पार्ट्या–पक्ष–बनवून देशाला तोडीत आहेत. एक कॉंग्रेस पक्ष आहे, एक समाजवादी पक्ष आहे, एक कम्युनिस्ट पक्ष आहे, तर एक जनसंघ आहे. प्रत्येकजण एकमेकांच्या विरुद्ध बोलतो. अशाप्रकारें वेगवेगळया पक्षाचे हे लोक कामाचा नाश करतात.

हिंदुस्थानांत हे जे पक्ष बनले आहेत, ते जातिभेदापेक्षां कमी भयंकर नाहींत. म्हणून, तुमच्याकडे हे पार्टीवाले आले तर त्यांना सरळ सांगा कीं तुमचे हे पक्ष तुम्ही शहरांत च ठेवा. आम्हांला त्यांची मुळीं च गरज नाहीं. आमच्या गांवांत हि आमचा एक पक्ष आहे. त्याचें नांव आहे 'गांव पक्ष'. तेवढा च आम्हांला पुरे.

तुम्ही गांवांत एक च पक्ष करा आणि गांवाचे तुकडे होऊं देऊं नका. शहरांतील पक्षवाले तुम्हांला मत मागायला येतील तेव्हां आम्हांला हे तुमचे झगडे नकोत, जो चांगला माणूस असेल,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २८७३८ वि. निबंध
क्रमांक ७२५९ नों. दि. २८-१०-७९

त्याला च आम्ही मत देऊं, असें त्यांना सांगा. जेथें फार अक्कल-वाले लोक राहतात अशा दिल्ली, कलकत्ता, मुंबई, या शहरांत तुमचे हे झगडे असूं द्या येथें ते नकोत, असें हि त्यांना तुम्ही सांगा. गांवांत आग लावणें सोपें आहे पण ती विझवणार कोण ? एकदां गोकुळाला आग लागली, तेव्हां भगवान् कृष्णांनीं ती सारी आग गिळून टाकली. अशी आग गिळणारा कोणी आहे ? म्हणून गांवाचें एक कुटुंब बनवून तुम्ही एकोप्यानें, गुण्यागोविंदानें रहा, असें मीं आतांपर्यंत तुम्हांला सांगितलें.

## नेक व्हा

आतां दुसरी गोष्ट. नेक व्हा. नेकीनें वागा. एक व्हाल तर नेक व्हाल च. तरी हि जे कांहीं दोष राहतील ते सोडले पाहिजेत. आमच्या दर्शनासाठीं कांहीं लोक मोठ्या श्रद्धेनें आले होते. मला त्यांच्या कानांत विडी दिसली. कान तर हरि-कथा ऐकण्यासाठीं आहेत, विडी ठेवण्यासाठीं नाहींत. असल्या वाईट संवयी सोडल्या पाहिजेत.

देवी-देवतांच्या पूजेला दारू लागते असें कांहीं लोक म्हणतात. पण ही चुकीची आणि शास्त्राच्या अगदीं विरुद्ध गोष्ट आहे. देवाला दारू नको. त्याला काय पाहिजे, हें तुम्हांला माहीत आहे. कांहींजण प्रेमानें माझ्याकडे येतात आणि मला फुलें, फळें देऊन जातात. तसें च देवाला हि फुलें, फळें द्यायला हवींत हें तुम्ही जाणतां. नाहींतर तुम्हीं मला हि दारू च दिली असती. पण साधु पुरुष दारू पीत नाहींत, हें तुम्हांला माहीत आहे. मग तुम्ही देवतांना दारू कां वाहतां ? ज्यांनीं ही रीत सुरू केली तो सैतान असला पाहिजे. तुम्हांला या वाईट गोष्टी सोडल्या पाहिजेत.

गांवचे लोक भक्त व्हावेत असे मला वाटतें. दररोज देवाची प्रार्थना करावी. शेतीच्या कामांत देवाचा जसा संबंध असतो, तसा शहरीं कामांत देवाशीं संबंध असत नाहीं. देशांत पीक कमी येवो, जास्त येवो, त्या शहरी लोकांचें कांहीं बिघडत नाहीं. गांव-करी जर या शहरी लोकांचें अनुकरण करतील तर त्यांची फार हानि होईल.

आम्हीं मिळून मिसळून काम केलें पाहिजे. आपला कपडा आपल्या हातांनीं तयार केला पाहिजे. 'पराधीनाला स्वप्नांत हि सुख मिळायचें नाहीं' असें संत तुलसीदासजींनीं आपल्याला सागितलें आहे. आम्ही जर बाहेरून कापड विकत घेऊं लागलों तर पराव-लंबी होऊं. सूत कांतण्याचें काम प्रत्येकजण करूं शकतो. गांवांत कांतणें, पिंजणें, विणणें, रंगविणें, शिवणें इत्यादि सर्व कामें चालतील. जमिनीच्या वाटपाबरोबर ग्रामोद्योग आवश्यक आहेत. या दोहोंना मी "सीता-राम" म्हणतों. भूदान-यज्ञ 'सीता' आहे आणि ग्रामोद्योग 'राम' आहे. असा जेव्हां सीताराम, सीताराम जप चालेल तेव्हां, गांवांत कुणी हि दुःखी असणार नाहीं.

गांवोगांव खूप पीक वाढावें, घरोघर चरखा चालावा, घरो-घर गाय बैल असावेत आणि सर्व मुलांना खूप दूध मिळावें. तसें च प्रत्येकाजवळ कामाची अवजारें असावीं, गांवांत कोणी येवो, त्याला खाऊं घालण्यासाठीं प्रत्येक घरांत भरपूर धान्य असावें, बागा फुलाफळांनीं बहरलेल्या असाव्या, निरनिराळ्या प्रकारच्या भाज्या असाव्या. या सर्व वस्तु गांवांत भरपूर असाव्यात, पण पैसा कमी असावा; असें मला वाटतें. लुटणारांच्या सोयीसाठीं हा पैसा बनविण्यांत आला आहे.

आपल्याला रामायण, भागवत, गीता वाचावयाची आहे, म्हणून आपण लिहिणें-वाचणें शिकूं या. जर येथील लोकांना आत्म-विद्या अवगत झाली तर जगांत त्यांना कुणी जिंकूं शकणार नाहीं. हें शरीर च फक्त माझें नाहीं, सर्व शरीरें माझीं च आहेत, आम्हां सर्वांमधें एका च परमेश्वराचा अंश आहे, असें ही आत्म-विद्या शिकविते. रामायण, भागवत, गीता यामधें ही च गोष्ट तुम्हांला सांपडेल.

खेडयांतील जनतेला एक होणें सोपें आहे. नंतर शहरवाले हि त्यांच्या मागोमाग येतील. आमच्या गांवांत कुणी भूमिहीन असणार नाहीं आणि कुणी भूमि-मालक असणार नाहीं, असें आज तुम्ही जसें ठरवितां त्याप्रमाणें आम्ही बाहेरील कापडावर बहिष्कार घालूं, आपल्या गांवांत कापूस पेरूं, सूत कांतूं, असें ठरवा. तुम्ही जर बाहेरून कापड विकत घेत असाल तर गुलाम व्हाल. सूत कांतणें फार च सोपें काम आहे. आमच्या आश्रमांत चार वर्षांचा मुलगा सुद्धां स्वतःच्या वर्षभराच्या कपडयाइतकें सूत कांततो.

## पांच मुख्य गोष्टी

एक आणि नेक होण्यासाठीं तुम्हांला पांच गोष्टी करायला हव्यात:

१. सर्व जमीन गांवाची करायची.

२. कापड, तेल, गूळ इत्यादि वस्तु गांवांत च तयार करायच्या.

३. दारू, बिडी इत्यादि वाईट व्यसनें सोडायचीं.

४. भांडायचें नाहीं. आणि कोठें भांडण झालें च तर त्याचा निवाडा गांवांतील सज्जनांकडून च करवून घ्यायचा, आणि

५. रोज संध्याकाळीं रामायण, भागवत, गीता इत्यादि ग्रंथांचें वाचन करायचें.

आम्ही सर्व भक्त होऊं, काम-क्रोध सोडूं, गांवांत कोणत्या हि प्रकारचा भेदभाव राहूं देणार नाहीं, असा निश्चय तुम्ही सर्व-जण करा. असा निश्चय केला तर च गांवोगांव "ग्राम-राज्य" "राम-राज्य" अथवा " खरें स्वराज्य " येईल. या पांच गोष्टी तुम्ही कराल तर " सर्वोदय समाज " स्थापन होईल.

बोलो : " सर्वोदयकी जय "

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५०३
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८१३८ विः १७१६
क्रमांक ९२५१ नोंः दिः १५१२८१
REFBK-0011503